PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 9, ISSUE 2

# युपीआय - व्यवहार समृद्ध करणारी सोपी प्रणाली

**मार्गदर्शक**
प्रो. डॉ. किशोर बा. मोहरीर
प्रो. डॉ. प्रदीप दा. घोरपडे

**संशोधनकर्ती**
डॉ. सुमिता सुधाकर
चिटमलवार

भारतातील सर्व आर्थिक पेमेंट यंत्रणांना एकत्रित करण्याकरिता भारत सरकारने भारतीय राष्ट्रीय भुगतान निगम या संस्थेची स्थापना एप्रिल 2009 ला करण्यात आली. भारतीय रिझर्व बँक (R.B.I.), मार्च 2011 च्या अभ्यासानुसार भारतातील प्रति व्यक्तीने एका आर्थिक वर्षात फक्त 6 वेळा “ Non-Cash” पेमेंट व्यवहार केलेले आहेत. भारतीय रिझर्व बँक च्या असेही लक्षात आले की, भारतातील 10 मिलियन किरकोळ विक्रेत्यांनी कार्ड आधारित पेमेंट स्वीकारण्याचे मान्य केले आहेत. याच अभ्यासावरून डिजिटल पेमेंट व्यवहारांच्या होणाऱ्या फरकाला भरून काढण्याकरिता 2012 मध्ये पुढील येत्या चार वर्षाकरिता ध्येय ठरवण्यात आले. या ध्येयाला रिझर्व बँकेने "Vision Statement" असे नाव देण्यात आले.

या "Vision Statement" मध्ये देशासाठी सुरक्षित, कार्यक्षम, सुलभ, प्रवेश करण्यायोग्य, समावेशक, आंतरक्रिया करण्यायोग्य, अधिकृत पेमेंट आणि सेटलमेंट सिस्टिम प्रणाली येणाऱ्या चार वर्षात विकसित केले जाईल असे आश्वासन देण्यात

आले. तसेच देशांतर्गत होणाऱ्या पेमेंट मार्केटमध्ये कागदी चलनी नोटांचा उपयोग कमी करण्याकरिता आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्याकरिता भारतीय रिझर्व बँकेचा उद्देश होता. याच उद्देशातून युपीआय प्रणाली विकसित करण्यात आली. युपीआय चा अर्थ युनिफाईड पेमेंट इंटरफेस असा आहे.

नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (NPCI) या रिअल टाइम पेमेंट प्रणाली म्हणजेच युपीआय ची निर्मिती केलेली आहे. सुरुवातीला 21 बँकेच्या सहाय्याने 11 एप्रिल 2016 रोजी युपीआय ही पेमेंट प्रणाली ग्राहकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली. परंतु सुरुवातीला युपीआय या पेमेंट पद्धतीचा वापर फारच कमी प्रमाणात झालेला दिसून येतो. त्यानंतर जेव्हा 2019 मध्ये कोरोना काळ आला त्यावेळी लोकांना घरातून बाहेर पडण्याची बंदी घालण्यात आली. संपूर्ण देशातच नव्हे तर संपूर्ण जगात लॉकडाऊन करण्यात आले. परंतु लोकांना जीवन जगण्याकरिता आवश्यक असलेल्या उपभोग्य वस्तूंची खरेदी रोख व्यवहारात करणे अवघड होऊन गेले. यातूनच ऑनलाइन व्यवहारांना चालना मिळाली आणि युपीआय प्रणालीचा विकास होत गेला.

आता वस्तुस्थिती अशी आहे की, टपरी पासून मोठ-मोठ्या मॉल्स पर्यंत सगळीकडे "क्यूआर कोड" दिसून येतात. पूर्वी डेबिट कार्ड किंवा रोख रकमेत व्यवहार व्हायचे, पण आता दहापैकी आठ जण ‘युपीआय’ द्वारे व्यवहार करण्यावर भर देतात. सर्वसामान्य लोकांपर्यंत इंटरनेट सेवा पोहोचल्यामुळे आणि युपीआय प्रणालीमुळे ऑनलाइन व्यवहार करणे सुलभ झाले. आता ‘युपीआय’ चा व्याप चांगलाच वाढलाय याचे मुख्य कारण या प्रणालीतील सुरक्षितता व सोपी पद्धत कारणीभूत ठरते. साता समुद्रा पलीकडील बाजारपेठा आता या प्रणालीला खुणावू लागल्या आहे.


"युपीआय" प्रणालीमुळे भारत हा देश जगातील सगळ्यात जास्त 'Real Time Payment Market' म्हणून प्रसिद्ध झालेला आहे. "ACI WORLD WIDE" आणि " GLOBAL DATA" अनुसार 2020 मध्ये भारताने युपीआय द्वारे 25.5 बिलियन इतके व्यवहार केलेले आहे. हे व्यवहार यूएस आणि चीन पेक्षा जास्त आहे. युपीआय ची यशस्वी वाटचाल बघता गुगलने डिसेंबर 2019 मध्ये "US FEDERAL RESERVE BOARD" ला एक प्रस्ताव दिला ज्यात असा उल्लेख आहे की, भारतासारख्या 'युपीआय' मॉडल प्रणालीला प्रेरणास्त्रोत समजून एक 'Real Time Payment System' विकसित करण्याची गरज आहे. असे सुचविण्यात आले आहे.

"Economist Intelligence Unit Report" 2021 नुसार, भारत हा युपीआय आधारित व्यवहारात जागतिक आघाडीवर आहे. या क्षेत्रात भारताने आज चीन आणि दक्षिण कोरियासारख्या देशांना मागे टाकले आहे. भारत व्यतिरिक्त आता ही प्रणाली भारताने भूतान, नेपाळ, मलेशिया, सिंगापूर, संयुक्त अरब अमिरात, फ्रान्स आणि युरोपियन युनियन अशा अनेक इतर देशांमध्ये उपलब्ध करून दिली आहे. यामुळे विदेशात राहणाऱ्या भारतीयांना सुद्धा युपीआय द्वारे व्यवहार सहज करता येईल.

जानेवारी 2022 ते ऑगस्ट 2022 या दरम्यान युपीआय द्वारे होणाऱ्या व्यवहारांमध्ये पुढील प्रमाणे वाढ दिसून येते.

| **महिना** | **रुपये (मिलियन मध्ये)** |
|---|---|
| जानेवारी 2022 | 4508.26 |
| फेब्रुवारी 2022 | 4414.55 |
| मार्च 2022 | 5278.75 |

| | |
|---|---|
| एप्रिल 2022 | 5479.85 |
| मे 2022 | 5714.85 |
| जून 2022 | 5605.75 |
| जुलै 2022 | 6021.86 |
| ऑगस्ट 2022 | 6293.73 |




## “युपीआय” चा वापर

“युपीआय” च्या मदतीने घरबसल्या ऑनलाइन पद्धतीने व्यवहार करण्याकरिता ग्राहकाला कोणत्याही युपीआय पेमेंट ॲप चा उपयोग करता येतो. जसे फोन पे, गुगल पे, भीम ॲप, पेटीएम, इ. पैकी कोणतेही एक मोबाईल ॲप्लिकेशन डाऊनलोड करून त्यामध्ये बँक खाते ॲड करून (सहभागी करून) युपीआय पिन तयार करावी लागते.

यानंतर ग्राहक 'युपीआय आयडी' च्या मदतीने ऑनलाइन व्यवहार करू शकतात. युपीआय द्वारे सर्व व्यवहार हे 24 तास 365 दिवस करता येतात. तसेच हे व्यवहार विनाशुल्क आहेत यासाठी बँक कोणतेही शुल्क आकारत नाही. युपीआय द्वारे करण्यात येणाऱ्या व्यवहारांवर रिजर्व बँकेचे नियंत्रण असल्याकारणाने ग्राहकांचा विश्वास बसणे व गैरव्यवहारांचे प्रकार यात आढळून येत नाही.

## उद्देश

1. युपीआय प्रणाली कॅशलेस अर्थव्यवस्था स्थापन करण्याकरिता उपयुक्त आहे का ? याचा शोध घेणे.
2. युपीआय प्रणालीच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
3. युपीआय प्रणालीमुळे प्राप्त होऊ शकणाऱ्या रोजगार संधीचा शोध घेणे.
4. युपीआय प्रणालीमुळे पर्यावरणाचे संरक्षण होऊ शकते का ? याचा अभ्यास करणे.
5. युपीआय प्रणालीच्या उपयोगामुळे सर्वसामान्य लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर होणाऱ्या परिणामांचे अध्ययन करणे.
6. युपीआय प्रणालीमुळे भ्रष्टाचाराला आळा बसू शकतो का ? हे अभ्यासणे.

## गृहीतकृत्ये

1. कॅशलेस अर्थव्यवस्था स्थापन करण्याकरिता युपीआय प्रणाली अधिकच उपयुक्त आहे.
2. युपीआय प्रणालीची कार्यपद्धती अगदी सहज सोपी व सुरक्षित आहे.
3. युपीआय प्रणालीद्वारे रोजगाराच्या संधी प्राप्त होतात.
4. युपीआय प्रणाली पर्यावरण संरक्षणाकरिता उपयुक्त आहे.

5. युपीआय प्रणालीच्या उपयोगामुळे सर्वसामान्य लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर सकारात्मक परिणाम होतो.
6. युपीआय प्रणालीमुळे भ्रष्टाचाराला आळा बसतो.

**निष्कर्ष**

1. यूपीआय द्वारे उपभोक्त्यांना मिळणाऱ्या सेवा या अतिशय उत्कृष्ट दर्जाच्या आहेत आणि त्यावर कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही.
2. यूपीआय ची कार्यपद्धती अतिशय सोपी, सरळ असल्यामुळे सर्वसामान्य लोकांना ती सहज समजते.
3. यूपीआय पेमेंट प्रणालीत उपभोक्त्याला त्वरित व्यवहार सेवा मिळाल्यामुळे भरपूर समाधान प्राप्त होते.
4. यूपीआय आधारित पेमेंट रिसीवर क्यूआर कोड प्रणालीच्या वापरामुळे व्यापाऱ्यांना गैरव्यवहार होण्यापासून संरक्षण मिळते.
5. यूपीआय द्वारे आर्थिक क्षेत्रात आणि फिनटेक क्षेत्रात रोजगाराची निर्मिती होते.
6. यूपीआय प्रणालीमुळे भ्रष्टाचाराला आळा बसतो. यूपीआय प्रणालीवर भारतीय रिझर्व बँकेचे नियंत्रण असल्याने या प्रणालीवर लोकांचा प्रचंड विश्वास आहे.
7. यूपीआय प्रणाली ऑनलाइन पद्धती स्मार्टफोन मध्ये उपलब्ध असल्याने बँकेच्या सुट्टीच्या वेळेस सुद्धा सेवा देण्यास तत्पर आहे.

8. यूपीआय हळूहळू नगदी व्यवहार आणि चलनी नोटांचे चलन कमी करेल त्यामुळे व्यवहारात पारदर्शक व्यवस्था आणि कमी रोख रक्कमी अर्थव्यवस्था निर्माण होईल.

## शिफारशी

1. काही वेळा पेमेंट करताना तांत्रिक अडचणीमुळे त्रुटी येतात तेव्हा पैसे बँक खात्यात परत येईल याकरिता सुमारे 48 तास लागतात, तेव्हा तो कालावधी कमी करण्यात यावा.
2. युपीआय प्रणाली मध्ये पैसे ट्रान्सफर करण्याची मर्यादा असते त्यामुळे त्या मर्यादेपलीकडे जाऊन पैसे ट्रान्सफर करता येत नाही, ती मर्यादा वाढविण्यात यावी.
3. युपीआय पिन मध्ये चार ते सहा अंक असतात जे अधिक सुरक्षिततेसाठी वाढविले पाहिजे.
4. युपीआय प्रणाली बद्दल लोकांमध्ये जनजागृती घडविणे आवश्यक आहे.
5. युपीआय या प्रणालीचा वापर कसा करायचा याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

## संदर्भसूची

1. **वर्तमानपत्रे** : लोकमत, नवभारत
2. **मासिके** : बिझनेस इंडिया, फोर्ब्स इंडिया
3. **वेबसाईट** : https://www.npci.org.in
www.economictimes.com